# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 20 December 2024

## Time 11.00 to 11.05 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: २० डिसेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.

****

कोणताही राजकीय पक्ष आणि खासदारांना संसद भवनाच्या कोणत्याही प्रवेशद्वारासमोर आंदोलन करता येणार नाही, असे स्पष्ट निर्देश लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी दिले आहेत.

दरम्यान, संसद भवन परिसरात काल आंदोलनादरम्यान भाजपचे दोन खासदार जखमी झाल्यामुळे, दिल्ली पोलिसांनी भाजपच्या तक्रारीवरुन काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविरोधात प्रथम माहिती अहवाल दाखल केला आहे.

आजही दिल्लीत विजय चौक ते संसद भवनापर्यंत काँग्रेस पक्षातर्फे अमित शहा यांच्या वक्तव्याविरोधात आंदोलन सुरु आहे. तर दुसरीकडे कालच्या आंदोलनात पक्षाचे दोन नेते जखमी झाल्याच्या निषेधार्थ सत्ताधारी भाजपच्या खासदारांनी निदर्शनं केली.

****

भारतामध्ये विमानभाडं हे बहुतेक देशांपेक्षा कमी असल्याचं नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी म्हटलं आहे. लोकसभेत एका लेखी उत्तरात त्यांनी ही माहिती दिली. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयानं निर्माण केलेल्या विमान भाड्यावर लक्ष ठेवणाऱ्या विभागानं देशातल्या आणि परदेशातल्या विविध मार्गांवरच्या विमानभाड्यांचे तुलनात्मक विश्लेषण केलं आहे. भारतीय विमान कंपन्यांचे प्रति किलोमीटर विमानभाडं कमी असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. २०२३ च्या तुलनेत २०२४ मध्ये विमानभाड्यात घट झाली असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

भारतीय पासपोर्टधारकांना २६ देशांमध्ये व्हिसामुक्त प्रवेश असून ४० देशांमध्ये व्हिसा ऑन अरायव्हलची सुविधा असल्याचं सरकारनं म्हटलं आहे. परराष्ट्र

राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांनी राज्यसभेत एका लेखी उत्तरात ही माहिती दिली. नेपाळ, भूतान आणि मालदीवच्या नागरिकांना भारतात व्हिसा–मुक्त प्रवेश आहे.

****

मुंबई जवळच्या समुद्रात झालेल्या बोट दुर्घटनेत शोधपथकाला आणखी एक मृतदेह आढळला असून, मृतांची संख्या १४ वर पोहोचली आहे. रुग्णालयात दाखल ९० व्यक्तींना उपचारानंतर घरी सोडण्यात आलं, उर्वरित जणांची प्रकृतीही स्थिर असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

दरम्यान, या अपघाताचा तपास करण्यासाठी भारतीय नौदलाने विशेष चौकशी समितीची स्थापना केली आहे.

****

नाशिक शहरातल्या आडगाव परीसरात सुमारे ३३५ एकर जागेत अद्ययावत आय टी पार्क साकारण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत केली. नाशिक पश्चीमच्या आमदार सीमा हिरे यांनी, नाशिकमध्ये आयटी पार्क, लॉजीस्टीक पार्क, गोदावरी शुध्दीकरणाचा नमामि गोदा प्रकल्प साकारावा अशी मागणी केली होती. आयटी पार्क साकारण्यासाठी वास्तुविशारद नियुक्त करण्याची प्रक्रीया सुरू असल्याचंही मुख्यमंत्री म्हणाले.

****

जीवनावश्यक वस्तूंसह शेतीशी निगडित सर्व वस्तूंवरचा वस्तू आणि सेवा कर माफ करण्याची शिफारस केंद्राकडे करावी, अशी मागणी आमदार एकनाथ खडसे यांनी केली आहे. ते काल विधानपरिषदेत महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर सुधारणा विधेयकावरच्या चर्चेत बोलत होते. जीएसटी अंमलबजावणी संदर्भात यंत्रणा अधिक मजबूत करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावर बोलतांना, खडसे यांच्या सूचनेनुसार खबरदारी घेण्याचं आश्वस्त करत, केंद्र सरकारकडून युरीयासह शेतीसाठीच्या साहित्यावर दिलं जाणारं अनुदान आणि इतर सुविधांकडे सदनाचं लक्ष वेधलं.

****

गेल्या लोकसभा निवडणुकीत वायव्य मुंबई मतदारसंघातले शिवसेना नेते रवींद्र वायकर यांच्या खासदारकीला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयानं काल फेटाळली. वायकर यांचे प्रतिस्पर्धी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अमोल किर्तीकर यांनी ही याचिका दाखल केली होती. न्यायमूर्ती संदीप मारणे यांनी ती फेटाळली आहे. मतमोजणीच्या वेळी तथाकथित वादग्रस्त मतं वायकर यांना

कशी मिळाली, हे सिद्ध करण्यात कीर्तीकर अपयशी ठरले असल्याचं न्यायालयाने म्हटलं आहे.

****

सिंहस्थ कुभमेळा काळात नाशिकरोड रेल्वे स्थानकात अतिरिक्त रेल्वेगाड्यांना थांबा देण्यात येईल, रेल्वेचा सिंहस्थ आराखडा ५०० कोटींचा असला तरी प्रवाशांना सुविधा पुरवण्याच्या दृष्टीने त्यात वाढ होऊ शकते, अशी माहिती, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक वीर मीना यांनी दिली. ते काल नाशिकमध्ये पहाणी दौऱ्यावेळी बोलत होते. नाशिकरोड, देवळाली कॅम्प, इगतपुरी आदी रेल्वे स्थानकांची त्यांनी पाहणी केली.

****

नांदेड विभागातल्या रंजनी-कोडी स्थानकादरम्यान करण्यात येणार्या तांत्रिक कामामुळे येत्या २९ डिसेंबर पर्यंत चार तासांचा लाईन ब्लॉक घेण्यात येणार आहे. यामुळे धर्माबाद-मनमाड मराठवाडा एक्स्प्रेस आज २० तारखेसह, २२, २३, २६, २७, २९ आणि ३० डिसेंबर रोजी धर्माबाद ते नांदेड दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे. मुंबई - नांदेड तपोवन एक्स्प्रेस २१, २२, २५, २६, २८, २९ या दिवशी १३० मिनिटं उशिरा, तर काचिगुडा - नगरसोल एक्स्प्रेस ९० मिनिटं उशिरा धावणार आहे. नगरसोल - नरसापूर एक्स्प्रेस २१ ते २९ डिसेंबर दरम्यान ९० मिनिटं उशिरा धावणार आहे. दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड जनसंपर्क कार्यालयानं ही माहिती दिली.

****

जालना समाजकल्याण विभागातली महिला लिपीक सुलोचना साबळेला पाच हजार रुपयांची लाच घेताना काल पकडण्यात आलं. ॲट्रासिटीच्या गुन्ह्यातल्या तक्रारदारास मंजूर झालेल्या ७५ हजार रुपयांचं अनुदान खात्यावर वर्ग करण्यासाठी त्यांनी ही लाच मागितली होती.

****